
# मुंब्र्यात इमारतीचा स्लॅब कोसळला

## 13 वर्षीय मुलीचा दुर्दैवी मृत्यू, 5 जण बचावले

प्रतिनिधी २८ जुलै

**ठाणे:** ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा परिसरात सोमवारी, (२७ जुलै) रोजी सायंकाळी एक भीषण अपघात घडला. दर्गा रोडवरील जनता बेकरी इमारतीजवळ आणि विरोधी पक्षनेते शानू पठाण यांच्या कार्यालयाला लागून असलेल्या, सुमारे ३८ वर्षे जुन्या फैयाज अपार्टमेंटची गॅलरी अचानक कोसळली. ही इमारत तळमजला अधिक चार मजली असून त्यात एकूण २८ फ्लॅट्स होते.

अपघाताच्या वेळी, १३ वर्षीय मुलगी आस्मा कादर शेख गॅलरीत उभी होती, तेव्हा संपूर्ण गॅलरी अचानक कोसळली आणि ती ढिगाऱ्याखाली गाडली गेली. या अपघातामुळे परिसरात घबराट पसरली. स्थानिक रहिवासी तात्काळ घटनास्थळी धावून गेले आणि त्यांनी बचावकार्य



सुरू केले. स्थानिक रहिवासी आणि अग्निशमन दलाच्या मदतीने अस्माला गंभीर अवस्थेत ढिगाऱ्याखालून बाहेर काढण्यात आले. तिला सुरुवातीला जवळच्या एका खाजगी रुग्णालयात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी तिची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याचे सांगून तिला तात्काळ कळवा येथील कळवा रुग्णालयात दाखल केले. मात्र, तिथे पोहोचल्यावर डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. अपघाताच्या वेळी इमारतीत अनेक लोक उपस्थित होते. गॅलरी कोसळल्यानंतर काही लोक इमारतीत अडकले. स्थानिक नागरिकांनी आपला जीव धोक्यात घालून अनेकांना वाचवले. याचवेळी, स्थानिक नगरसेवक आणि विरोधी पक्षनेते शानू पठाण हे देखील घटनास्थळी पोहोचले. त्यांनी शिडीच्या साहाय्याने इमारतीपर्यंत पोहोचून आत अडकलेल्यांना बाहेर काढण्यात सक्रिय भूमिका बजावली. स्थानिक रहिवाशांनीही बचावकार्यात सक्रिय सहभाग घेऊन एक मोठी दुर्घटना टळवली. घटनेची माहिती मिळताच, अग्निशमन दल, पोलीस आणि महानगरपालिकेची पथके घटनास्थळी दाखल झाली आणि संपूर्ण परिसर सील करून बचाव व मदतकार्य सुरू केले. अधिकाऱ्यांनी इमारतीच्या स्थितीची पाहणी केली असून पुढील कारवाई सुरू केली आहे.

या अपघातामुळे जुन्या आणि जीर्ण इमारतींच्या सुरक्षिततेबद्दल पुन्हा एकदा गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की, अशा धोकादायक इमारतींची तातडीने पाहणी करून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक कारवाई करावी.

# यंदा गणेशभक्तांचा प्रवास सुकर होणार! मध्य रेल्वेकडून मोठा निर्णय

प्रतिनिधी २८ जुलै

मुंबई: आगामी गणेशोत्सवात कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना रेल्वेकडून काही अंशी दिलासा मिळाला आहे. गणेशोत्सवकाळात मुंबईहून कोकणात २४६ विशेष रेल्वे फेऱ्या चालवण्याचा निर्णय मध्य आणि कोकण रेल्वेने घेतला आहे. त्यात विनाआरक्षित रेल्वे फेऱ्यांचाही समावेश आहे. या विशेष रेल्वे फेऱ्यांचे आरक्षण १ ऑगस्टपासून खुले होणार आहे. विशेष रेल्वेगाड्या किमान २० ते कमाल २३ डब्यांसह धावणार आहेत. विनाआरक्षित मेमू फेऱ्या १२ डब्यांसह धावणार आहेत.

गाडी क्रमांक ०११०३/४ सीएसएमटी-सावंतवाडी-सीएसएमटी (३२ फेऱ्या) ०११५१/२ सीएसएमटी-सावंतवाडी- सीएसएमटी (३४ फेऱ्या) ०११५३/४ सीएसएमटी-रत्नागिरी- सीएसएमटी (३२ फेऱ्या) ०११७१/२एलटीटी-सावंतवाडी- एलटीटी (३४ फेऱ्या) ०११३१/२ एलटीटी-सावंतवाडी-एलटीटी द्विसाप्ताहिक (८ फेऱ्या) ०११२९/३० एलटीटी-सावंतवाडी साप्ताहिक (४) ०११६७/८एलटीटी-रत्नागिरी-एलटीटी आठवड्यातून ५ वेळा (२२ फेऱ्या) ०११६५/६ एलटीटी-मडगाव-एलटीटी साप्ताहिक वातानुकूलित (४ फेऱ्या) ०११८५/६ एलटीटी-मडगाव-एलटीटी साप्ताहिक (४ फेऱ्या) आणि पुणे-रत्नागिरी-पुणे १० विशेष फेऱ्या चालवण्यात येतील. विनाआरक्षित म्हणून दिवा-खेड (३२ फेऱ्या) आणि दिवा-चिपळूण-दिवा (३० फेऱ्या) मार्गावर एकूण ६२ मेमू फेऱ्या धावणार आहेत. ११ ते २३ सप्टेंबरदरम्यान मेमू धावणार आहेत. १, २ आणि ३ ऑगस्टला आरक्षण खुले होणार आहे. मध्य रेल्वेने मुंबई उपनगरी रेल्वेवरील सर्व ७९४ महिला डब्यांमध्ये 'इमर्जन्सी टॉकबॅक' यंत्रणा कार्यान्वित केली आहे. या सुविधेमुळे महिला प्रवाशांना आपत्कालीन परिस्थितीत थेट लोकलच्या गार्डशी संपर्क साधता येणार आहे. पश्चिम रेल्वेवर मात्र अद्याप ४५ महिला डबे या सुविधेपासून वंचित आहेत. आपत्कालीन स्थितीत महिला प्रवाशांना तातडीने मदत मिळावी, यासाठी प्रत्येक महिला डब्यात टॉकबॅक बटण बसवण्यात आले आहे. हे बटण लोकलच्या गार्डच्या केबिनमधील यंत्रणेशी जोडलेले आहे. प्रवाशांनी तीन सेकंद बटण दाबून ठेवल्यानंतर गार्डच्या केबिनमधील इमर्जन्सी रिस्पॉन्स युनिटवर सूचना मिळते. त्यानंतर संबंधित प्रवाशाशी थेट संवाद साधणे शक्य होते. प्रवाशांनी कळवलेल्या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन गाडी पुढील स्थानकावर थांबवायची की, स्थानकांदरम्यान थांबवायची, याचा निर्णय गार्डकडून घेतला जातो. मध्य रेल्वेच्या लोकलमधील सर्व ७९४ महिला डब्यांत ही यंत्रणा सुरू करण्यात आली आहे.

# मीरा रोडमधील स्पा आड अनैतिक धंदा

## मालक आणि मॅनेजरला अटक

प्रतिनिधी २८ जुलै

**मुंबई:** मीरा रोड पूर्व येथील कनकिया पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बेव्हर्ली पार्क रोडवरील आरबीके स्कूलसमोरील बेकायदेशीर 'एएनके स्पा' सेंटरवर पोलिसांनी छापा टाकत कथित देहव्यापार प्रकरणाचा पर्दाफाश केला. या कारवाईत पाच महिलांची सुटका करण्यात आली असून स्पा सेंटरचा व्यवस्थापक आणि मालक यांना ताब्यात घेण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मीरा विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त गणपत पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. छाप्यात स्पा सेंटरमध्ये कथित वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती समोर



आल्यानंतर पोलिसांनी तत्काळ धाड टाकली. कारवाईदरम्यान पाच महिलांची सुटका करण्यात आली असून स्पा सेंटरचा व्यवस्थापक आणि मालक यांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. या प्रकरणी संबंधितांविरुद्ध अनैतिक मानवी वाहतूक (प्रतिबंध) कायद्यासह अन्य संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. या कारवाईनंतर परिसरात काही काळ खळबळ उडाली होती. प्रकरणाचा अधिक तपास कनकिया पोलीस ठाण्याचे अधिकारी करत असून, या रॅकेटशी संबंधित अन्य व्यक्तींचा शोध घेतला जात आहे.

# दुसऱ्या जातीच्या मुलाशी संबंध असल्याने आईचा संताप; केली मुलीची हत्या

प्रतिनिधी २८ जुलै

**ठाणे:** ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर कॅम्प-२ मधून ऑनर किलिंगचे एक धक्कादायक प्रकरण उघडकीस आले आहे. एका आईने आपल्या १९ वर्षीय मुलीचा दुपट्ट्याने गळा दाबून खून केल्याचा आरोप आहे. मुलीचे दुसऱ्या जातीच्या पुरुषासोबत प्रेमसंबंध होते, ज्याला आईचा सातत्याने विरोध होता. याच वादातून ही घटना घडली. पोलिसांनी सध्या आरोपी आईला अटक केली आहे. आरोपी महिलेची ओळख आशा गरूड अशी पटली आहे. प्राथमिक तपासात असे समोर आले आहे की, उल्हासनगरमधील भैय्यासाहेब आंबेडकर नगर येथे राहणाऱ्या आशा दत्ता गरूड (४०) यांच्या मुलीचे दुसऱ्या जातीच्या पुरुषासोबत प्रेमसंबंध होते. आई या नात्यावर नाराज होती आणि त्यामुळे घरात अनेकदा वाद होत असत. रविवारी रात्री उशिरा आई आणि मुलगी घरी असताना प्रेमसंबंधांवरून पुन्हा वाद झाला. रागाच्या भरात आईने आपल्या मुलीचा दुपट्ट्याने गळा दाबल्याचा आरोप आहे, ज्यामुळे गुदमरून तिचा जागीच मृत्यू




झाला. या घटनेमुळे कुटुंबात खळबळ उडाली आहे. मुलीच्या वडिलांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच, उल्हासनगर पोलीस घटनास्थळी दाखल झाले, मृतदेह ताब्यात घेतला आणि तपास सुरू केला. पोलिसांच्या माहितीनुसार, प्राथमिक तपासाच्या आधारे पोलिसांनी आरोपी आईला अटक केली आहे. उल्हासनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष आव्हाड यांनी या घटनेला दुजोरा दिला आणि सांगितले की, पोलीस या प्रकरणाचा सर्व बाजूंनी तपास करत आहेत. घटनेशी संबंधित पुरावे गोळा केले जात आहेत. प्राथमिक तपासानुसार हे प्रकरण 'ऑनर किलिंग'चे असल्याचे सूचित होते.

# अरबी समुद्रात चक्राकार वारे, अति मुसळधार पावसाचा इशारा, 22 जिल्ह्यांना अलर्ट

प्रतिनिधी २८ जुलै

मुंबई. जून आणि जुलैमध्ये पावसाने म्हणावा तसा जोर धरला नाही. राज्याच्या अनेक भागात पुरेसा पाऊस पडला नाही. त्यामुळे बळीराजाची चिंता वाढली आहे. काही भागात ढगफुटी सदृश्य पाऊस पडल्याने त्याचा शेतीला काही फायदा झालेला नाही. तर राज्यातील अनेक भाग अजूनही कोरडे ठाक आहेत. मात्र आता मान्सूनची परिस्थिती बदलत आहे. येत्या काही दिवसात राज्यात चांगला पाऊस होण्याचा अंदाज आहे. रत्नागिरीत तर पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. त्यामुळे रत्नागिरीत पाऊस जोर धरेल अशी आशा व्यक्त केली जात आहे. रत्नागिरी जिल्ह्यासाठी पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. अरबी समुद्रात कोकण किनारपट्टीवर चक्राकार वारे निर्माण झाले आहेत. त्यामुळे किनारपट्टी भागात ताशी 40 ते 50 किलोमीटर वेगाने वारे वाहणार आहेत. कोकणात सकाळपासूनच सरीवर सरी कोसळत आहेत. पुढील काही तासात कोकण किनारपट्टी भागात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. कोकणात आज पासून पुढचे चार दिवस पावसाचा जोर वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.


या चार दिवसात समुद्र देखील खवळलेला राहिल. समुद्रात चार मीटर उंचीच्या लाटा उसळणार आहेत. त्यामुळे मच्छिमारांना सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# कालाचौकी पोलिसांची धडक कारवाई; पिस्तूल व 6 जिवंत काडतुसांसह सराईत आरोपी गजाआड

प्रतिनिधी २८ जुलै

**मुंबई:** कालाचौकी पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने रात्रीच्या गस्ती दरम्यान मोठी कारवाई करत विनापरवाना देशी बनावटीचे पिस्तूल आणि सहा जिवंत काडतुसे बाळगणाऱ्या सराईत आरोपीला अटक केली. आरिफ मोहम्मद असलम शेख (३२) रा. जे.जे. कॉलनी, रिक्लेमेशन रोड, वांद्रे पश्चिम असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २७ जुलै २०२६ रोजी श्रीकांत रेड्डीज रोडवरील बीएमसीच्या ई वॉर्ड कार्यालयासमोरील रे रोड येथील ठाकूर गोदाम परिसरात गस्तीदरम्यान दहा जण महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या हुक्क्याचे सेवन करत असल्याचे आढळून आले. त्यावेळी पोलिसांनी सर्वांची झडती घेतली असता आरिफ शेख याच्याकडे विनापरवाना शस्त्र



आढळून आले. झडतीदरम्यान आरोपीकडून ₹२५ हजार किमतीचे ७.६५ मिमी कॅलिबरचे भारतीय बनावटीचे पिस्तूल, ₹१,२०० किमतीची सहा जिवंत काडतुसे, सॅमसंग आणि वनप्लस कंपनीचे दोन मोबाईल फोन तसेच आधार कार्ड जप्त करण्यात आले. पोलिस तपासात आरिफ शेख हा सराईत गुन्हेगार असल्याचे समोर आले आहे. त्याच्याविरुद्ध वांद्रे व विमानतळ पोलीस ठाण्यात गंभीर मारहाणीचे आठ गुन्हे, तर वांद्रे पोलीस ठाण्यात विनयभंगाचा एक गुन्हा नोंद आहे. तसेच वांद्रे पोलीस ठाण्यातील गुन्हा क्रमांक ९१९/२०२६ मध्ये तो फरार आरोपी असून त्याच्यावर यापूर्वी दोन वेळा तडीपारची कारवाईही करण्यात आली होती. या प्रकरणी कालाचौकी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३२३/२०२६ नोंद करण्यात आला असून आरोपीविरुद्ध शस्त्र अधिनियम, १९५९ मधील कलम ३ व २५ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील कलम ३७(१)(अ) व १३५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीसोबत आढळलेल्या अन्य नऊ जणांविरुद्ध कोटपा अधिनियम, २००३ मधील कलम ४ व २१ अन्वये कारवाई करण्यात आली असून प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक हसन मुलाणी करत आहेत. ही कारवाई मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, सहपोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) मनोजकुमार शर्मा, सहपोलीस आयुक्त (गुन्हे) अनिल कुंभारे, अपर पोलीस आयुक्त विक्रम देशमाने, पोलीस उपायुक्त अनुराग जैन यांच्या मार्गदर्शनाखाली कालाचौकी पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने केली.

# सचिन आहिर यांची स्टेजवरच एकनाथ शिंदे यांच्याकडे मोठी मागणी

प्रतिनिधी २८ जुलै

**मुंबई रू** नुकताच राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोठे भाष्य केले. एकनाथ शिंदे यांनी म्हटले की, भूमी पूजनसाठी आम्ही काम थांबवले नाही. पेपरमध्ये येणार नंतर काम करू असे आम्ही केले नाही. वेळेत प्रकल्प पूर्ण करू...तीन हात नाका येथे अनेक भूगर्भात अनेक लाईन आहेत. त्यामुळे एशियामध्ये सर्वात जास्त वेळ या तीन हात नाका ठिकाणी थांबावे लागते. ते आता वाहतूककोंडी मुक्त होणार.. 15 सेकंद लागणार.. नौपाडा ,वागळे, नवीन स्टेशन, कोपरीकडे जाणार. सोपी कामे सर्व करतात. मात्र, आम्ही अवघड कामे करतो. सर्व मंजुरी मिळाल्या...हा प्रकल्प गेम चेंजर प्रकल्प आहे.. फ्री व्हे, कोस्टल रोड होत आहे...शहरात या गाड्या येणार नाही...प्रदूषण वाहतूक कोंडी,अपघात कमी होणार.. ठाणे बोरिवली टनेल आता 20 मिनिटमध्ये जाता येणार.गोरेगाव मुंबई लिंक रोड प्रमाणे...ठाणे बोरिवली प्रकल्प होत आहे. पुढे एकनाथ शिंदे म्हणाले की, सचिन आहेर स्टेजवरून बोलले... वरळीत लक्ष द्या. आम्ही तिथली ट्रॅफिक कमी करू लक्ष देऊ... ठाणे बदलत आहे तसे वरळी देखील बदला. आव्हान असलेला प्रकल्प लोणावळा येथे



केला. आम्ही काम केले ले परफेक्ट आहे... असा कधी पडतो का? किती तरी प्रकल्प स्टे आणले...आमचे प्रगती सरकार... काय प्रोजेक्ट आम्ही केले . मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस टीम वेगाने काम करत आहे. पॉड टेक्सी बनत आहे. इंटरनेल मेट्रो करत आहे. ठाणे बदलत आहे. .ठाणेकरांची स्वप्नपूर्ती होत आहेत. आनंद दिघे लोकप्रतिंधी मागे उभे राहिले... आम्ही कोणालाही बेघर केले नाही...सर्वांना घरे दिली...अगोदर लोकांचा पाय ब्रेक वर होता आमचा पाय एक्सिलेटर वर आहे. पुढे एकनाथ शिंदे यांनी म्हटले की, फेको नाही स्पेको प्रकल्प आहे...आम्ही लवकर प्रकल्प केला तर इंसेंट्विव देऊ.... अनेक प्रकल्प मार्गी लावत आहे... 900 बेडचr आरोग्य व्यवस्था आपण सिव्हिल रुग्णालयाची करत आहे.

# बनावट वर्क ऑर्डर दाखवून एमटीएनएलची 9 लाखांची भूमिगत केबल चोरी

प्रतिनिधी २८ जुलै


**मुंबई:** कांदिवली (पूर्व) येथील अशोकनगर परिसरातून बनावट एमटीएनएल वर्क ऑर्डर तयार करून सुमारे ९ लाख किमतीची भूमिगत कॉपर केबल चोरी केल्याप्रकरणी समता नगर पोलिसांनी दोन जणांना अटक केली आहे. या प्रकरणातील मुख्य सूत्रधार अद्याप फरार असून त्याचा शोध सुरू आहे. तसेच या गुन्ह्यात एमटीएनएलमधील काही कर्मचाऱ्यांचा सहभाग होता का, याचाही तपास पोलिसांकडून केला जात आहे. या प्रकरणात सुरेश शिंदे (३८) आणि स्वप्निल शेलार (३५) यांना २२ जुलै रोजी अटक करण्यात आली. २३ जुलै रोजी त्यांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने २९ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. समता नगर येथील एमटीएनएलचे व्यवस्थापक वीरेंद्र लालताप्रसाद यादव (५२) यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. अशोकनगर क्रॉस रोड क्रमांक ४ ते साई अरमान बिल्डिंगदरम्यान जमिनीखाली टाकण्यात आलेल्या २०००-पेअरच्या चार कॉपर केबल्सपैकी सुमारे १५३ मीटर केबल कापून चोरी करण्यात आली होती. चोरी झालेल्या जुन्या वापरातील केबलची किंमत सुमारे ९ लाख ५०० असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. तपासादरम्यान घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजची छाननी करण्यात आली. तसेच पुणे येथील एमटीएनएल कार्यालयातून फायबर कटचा अलर्ट मिळाल्यानंतर केबल चोरीचा उलगडा झाला. केबल चेंबर आणि अंडरग्राऊंड डक्टची तपासणी केली.

# TET पेपर फुटी प्रकरणी शिक्षण मंत्री दादा भुसेंनी सात दिवसात राजीनामा द्यावा, अन्यथा काँग्रेस राज्यभर रस्त्यावर उतरेल : सागर साळुंखे

प्रतिनिधी २८ जुलै

**मुंबई :** नीट पेपर फुटी प्रमाणेच राज्यात सीईटी व टीईटीचे पेपर फुटले आहेत, याचा ६ लाख विद्यार्थ्यांना फटका बसला आहे. भाजपा सरकारच्या नालायकपणामुळे लाखो विद्यार्थी व पालकांना मनस्ताप झाला असून त्यांच्या स्वप्नांवर वरंवटा फिरवला आहे पण शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी त्याची जबाबदारी स्विकारलेली नाही. येत्या ७ दिवसात शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा अन्यथा समविचारी पक्ष व संघटना यांच्यासह काँग्रेसच्या विद्यार्थी संघटना रस्त्यावर उतरून तीव्र आंदोल करतील, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश NSUI चे अध्यक्ष सागर साळुंखे आणि मुंबई युवक काँग्रेसच्या अध्यक्ष झीनत शबरीन यांनी दिला आहे. टिळक भवन येथे पत्रकारपरिषदेत शिक्षण विभागाच्या भ्रष्ट कारभाराचा पंचनामा करत गैरकारभार चव्हाट्यावर मांडण्यात आला. यावेळी NSUI, युवक काँग्रेसच्या वतीने जेन झी युनिव्हर्सिटी मार्फत शिक्षणमंत्री दादा भुसे यांची प्रतीकात्मक गुणपत्रिका जाहीर करण्यात आली. राज्यातील शिक्षण क्षेत्रातील अपयशामुळे या गुणपत्रिकेत दादा भुसे यांना नापास घोषित करण्यात आले.

यावेळी बोलताना सागर साळुंखे पुढे म्हणाले की, राज्यातील शिक्षण व्यवस्था मोडकळीस आलेली आहे. भाजपा महायुती सरकारने शिक्षण हे




सेवेसाठी नाही तर पैसे कमावण्याचे साधन बनवले आहे. शिक्षकांना बीएलओ चे काम दिल्याने शाळा ओस पडल्या आहेत, मुलांचे नुकसान होत आहे. तर अतिरिक्त कामाच्या ताणामुळे शिक्षकांचे मानसिक स्वास्थ बिघडले आहे, मुंबईत एका शिक्षकाचा अशाच कामाच्या ताणामुळे मृत्यू झाला आहे. शालेय शिक्षण विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग व वैद्यकीय शिक्षण विभाग या तिन्ही विभागात अनागोंदी कारभार सुरु आहे. नंदुरबार जिल्ह्यात आदिवासी विद्यार्थ्यांची फसवणूक करुन हजारो रुपये उकळले जात आहेत. बोगस नर्सिंग स्कूलचा सुळसुळाट झाला आहे. पुण्यातील सीईओपी कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांकडून ८१ हजार रुपये डेव्हलपमेंट फी, २२ हजार रुपये लॅबोरेटरी फी घेतली तसेच १७ हजार रुपये शिक्षण फी आकारली जाते, अशा पद्धतीने चंद्रकांत पाटील यांनी लूट चावलली आहे. शिक्षण विभाग पैसे कमावण्याचा धंदा बनवला आहे, कॉलेज प्रवेश प्रक्रियेसाठी पाच कोटी रुपयांचे टेंडर दिले आहे पण अद्याप अकरावीच्या ४ लाख विद्यार्थ्यांचे प्रवेश बाकी आहेत. शिक्षण विभागातील हे गैरप्रकार थांबवले नाहीत तर रस्त्यावर उतरून सरकारला जाब विचारू असेही सागर साळुंखे यांनी म्हटले आहे. यावेळी मुंबई युवक काँग्रेसच्या अध्यक्ष झीनत शबरीन म्हणाल्या की, टीईटी पेपरफुटीनंतर युवक काँग्रेसने विविध आंदोलने करुन सरकारला जागे करण्याचा प्रयत्न केला पण सरकार अजून जागे झालेले नाही. शिक्षण मंत्री दादा भुसे यांचा राजीनामा घेतला जात नाही तोपर्यंत हे आंदोलन सुरुच राहिल. भाजपा सरकारने नीट व सीईटी पेपर फुटीमुळे लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळ केला असताना, मंत्री मंगलप्रभात लोढा हे थँक्यू मोदी, हे अभियान चालवत आहेत हे आश्चर्य आहे. आंदोलन करणा-या विद्यार्थ्यांवर अमानुष लाठीहल्ला केला, पॅलेट गनने चालवल्या बिहारमध्ये तर एके ४७ रायफलने गोळीबार केला. हजारो विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल केले म्हणून थँक्यू मोदी अभियान करत आहात का? असा संतप्त प्रश्न विचारून भाजपाला जनाची नाही मनाची तर आहे का, असेही झीनत शबरीन य़ांनी म्हटले आहे. NSUI चे प्रदेश महासचिव ऋषीकेश खंडाळे यांना शिक्षण विभागाच्या गलथान आणि भोंगळ कारभावरील सादरीकण केले. या पत्रकार परिषदेला दक्षिण मध्य मुंबई युवक काँग्रेसच्या अध्यक्षा प्रज्ञा ढवळेही उपस्थित होत्या.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ओम शिव साई सीएचएस, पहिला मजला, बीएमसी मार्केट, रनवाल व ओंकार ई-स्क्वेअर जवळ, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र – ४०००२२. येथे प्रकाशित केले. ♦ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ♦ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 26 /A 3072, RRC Helpline No. 8484842135